I J R S S I S, Spl Issue (IV), March-2022 : 429-432
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article
Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATIONwww.ijrssis.in

# चंद्रपुर जिल्हयातील उच्च शिक्षण संस्थांमधील ग्रंथालय संसाधनांच्या उपयोगितेच्या समस्या : एक अभ्यास

प्रा.दिलीप विरूटकर

Corresponding Author : ddvirutkar@gmail.com

Communicated :20.02.2022 | Revision : 15.03.2022 Accepted :25.03.2022 | Published: 01.04.2022

**संदर्भ :**
उच्च शिक्षणाची केंद्रे म्हणजे विद्यापीठ आणि महाविद्यालये, आजची विद्यापीठे आणि महाविद्यालये ही तरूण नवपिढीची शिक्षा–केंद्रे आहेत असे म्हणणे वावगे ठरणार नाही. उच्च शिक्षणात सातत्याने घडून येणारे बदल आज जगात सर्वत्र पहायला मिळत आहेत. जागतिकीकरण आणि मुक्त अर्थव्यवस्था या संकल्पनाच्या स्विकारामुळे जगातील सर्वच क्षेत्रात बदल झालेले आहेत. तद्वतच उच्च शिक्षण पध्दतीवरही या बदलांचा प्रभाव अपरिहार्याने झाला आहे. ग्रंथालय हे शैक्षणिक संस्थेचे वैभवस्थान समजले जाते. त्याचे महत्व अनेक परींनी सांगता येईल. वर्गात शिकविल्या जाणाऱ्या विषयाच्या अध्यापनाची परिपूर्ती ग्रंथालयातच होणार आणि जिवनाशी संबंध त्या द्वारे जोडला जाणार, वर्गात विषय समजावून दिल्यावर त्या बाबतीत अधिक ज्ञान मिळविण्याची जिज्ञासा अनेक विद्यार्थ्यांना होते. तिची तृप्तता ग्रंथालयाता होऊन ते एक प्रगतीचे विद्यार्थ्यांना विशाल क्षेत्रात नेण्याचे साधन आहे. आज जगात ज्ञानाचे प्रत्येक दालन कसे समृध्द होत आहे चंद्रपुर जिल्हयातील उच्च शिक्षण संस्थांमधील ग्रंथालय संसाधनांच्या उपयोगितेच्या समस्या : एक अभ्यास करतांना जिल्हातील महाविद्यालयाचा वर्गवार अभ्यास केला आहे. त्यात ग्रंथालयातील उपलब्ध साधने त्याचा वापर करणारे विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा अभ्यास केला आहे.

**बिजशब्द –** प्रस्तावना, महाराष्ट्रातील आदिवासी क्षेत्राची पार्श्वभुमी.

**प्रस्तावना:**
उच्च शिक्षणाची केंद्रे म्हणजे विद्यापीठ आणि महाविद्यालये, आजची विद्यापीठे आणि महाविद्यालये ही तरूण नवपिढीची शिक्षा–केंद्रे आहेत असे म्हणणे वावगे ठरणार नाही. उच्च शिक्षणात सातत्याने घडून येणारे बदल आज जगात सर्वत्र पहायला मिळत आहेत. जागतिकीकरण आणि मुक्त अर्थव्यवस्था या संकल्पनाच्या स्विकारामुळे जगातील सर्वच क्षेत्रात बदल झालेले आहेत. तद्वतच उच्च शिक्षण पध्दतीवरही या बदलांचा प्रभाव अपरिहार्याने झाला आहे. ग्रंथालय हे शैक्षणिक संस्थेचे वैभवस्थान समजले जाते. त्याचे महत्व अनेक परींनी सांगता येईल. वर्गात शिकविल्या जाणाऱ्या विषयाच्या अध्यापनाची परिपूर्ती ग्रंथालयातच होणार आणि जिवनाशी संबंध त्या द्वारे जोडला जाणार वर्गात विषय समजावून दिल्यावर त्या बाबतीत अधिक ज्ञान मिळविण्याची जिज्ञासा अनेक विद्यार्थ्यांना होते. तिची तृप्तता ग्रंथालयात होऊन ते एक प्रगतीचे विद्यार्थ्यांना विशाल क्षेत्रात नेण्याचे साधन आहे. आज जगात ज्ञानाचे प्रत्येक दालन कसे समृध्द होत आहे, आपले राष्ट्र व इतर राष्ट्रे यांत किती तरी आहे. आपल्या पूर्वजांचा वारसा काय आहे आणि आज जग कोणीकडे जात आहे. या सगळया गोष्टींची कल्पना देऊन दृष्टी फोकविण्यास, मन प्रगल्भ करण्यास, मनाला उद्बोधन व चेतना देण्यास ग्रंथालयासारखे ठिकाण नाही, ते ''ज्ञानाचे सदावर्त आहे'' डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी शैक्षणिक संस्थेतील सर्व कार्याचा केंद्र बिंदू ग्रंथालये असून संशोधन आणि शैक्षणिक उपक्रमामध्ये ही ग्रंथालये महत्वाची भुमिका बजावतात असे आपल्या आयोगाच्या अहवालात म्हटले आहे. उच्च शिक्षण घेतांना विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सखोल अभ्यासाची गरज असते. उपलब्ध पाठयपुस्तके यासाठी अपूरी पडतात. यासाठी पाठयपुस्तकाव्यतिरिक्त विषयांचा सखोल अभ्यास मांडणारी पुस्तके, संदर्भ, ग्रंथ, नियतकालिके, अवांतर माहिती देणारे पुस्तके यांचे सहाय्य घ्यावे लागते. ही सर्व संसाधने (वाचन साहित्य) महाविद्यालयीन आणि षेवटि ग्रंथालयाचे काम आहे. ग्रंथालयाचा दर्जा हा त्यातील 1. उपलब्ध

संसाधनांवर 2. त्यात दिल्या जाणाऱ्या सेवा/सुविधांवर आणि 3. त्याचा उपयोग घेणाऱ्या वाचकांवर ठरविला जातो. वाचन साहित्यांचा प्रचंड निर्मितीमुळे आज कोणतेही ग्रंथालय स्वयंपुर्ण राहू शकत नाही. त्यास अनेक ग्रंथालय व माहिती केंद्राचे सहाय्य घेणे आवश्यक झाले आहे, आणि ग्रंथालयात संगणकाच्या वापरामुळे ते सहज शक्य झाले आहे. विकासाच्या दृष्टिने तसा मागासलेला गेल्या दोन दशकापासून इथे शिक्षणाची गंगा वाहणे सुरू झाली आहे. या जिल्हयातील महाविद्यालये हीच उच्च शिक्षणाची ठिकाणे आहेत. या महाविद्यालयात उपलब्ध असलेली संसाधने, त्यातून दिल्या जाणाऱ्या सेवा, त्यात असणाऱ्या सोयी सुविधा, त्याचा उपयोग घेणारा वाचक, त्याच्या समस्या यांचा विचार होणे गरजेचे आहे.

**विषय निवडीची कारणे :**

उच्च शिक्षणात शिक्षण घेतांना प्रगल्भता वाढविण्यासाठी सतत सखोल वाचनाची आणि मननाची आवश्यकता असते. सतत वाचनामुळे ज्ञानाच्या कक्षा रूंदाविल्या जातात. आज अनेक ज्ञानशाखेचा विस्तार प्रचंड प्रमाणात झालेला आहे. महाविद्यालयात क्रमीक पुस्तकांच्या आधारे तो परीक्षा तर पास होऊ शकतो परंतू त्या आधारे विषयाचा सखोल ज्ञान प्राप्त करू शकत नाही. यासाठी क्रमीक पुस्तकाहून त्या विषयाची सखोल ज्ञान देणारी पुस्तके, संदर्भग्रंथ, नियतकालिके अभ्यासने गरजेचे असते. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना ग्रंथालयाविषयी एवढी ओढ नसते कारण शालेय शिक्षणात तो ग्रंथालयाविशयी अनभिज्ञ असतो. त्यामुळे महाविद्यालयीन जीवनातही तो ग्रंथालयाचा उपयोग घेतांना लाजतो, बुजतो. याच काळात विद्यार्थ्यांच्या मनात ग्रंथ आणि ग्रंथालयाविषयी आवड निर्माण करणे गरजेचे असते. यासाठी महाविद्यालय ग्रंथालयातून ग्रंथ कसे शोधावे, संदर्भ ग्रंथ कसे पाहावे, कोणत्या संदर्भ ग्रंथात कोणती माहिती उपलब्ध असते, नियतकालिके काय असतात याचे प्राथमिक धडे देणे आवश्यक ठरते. आता बऱ्याच महाविद्यालयापासून ग्रंथपालयाद्वारे ओरीएंटेशन प्रोग्राम राबविले जातात. चंद्रपुर जिल्हा मागासलेला, आदिवासी बहूल असल्यामुळे येथील महाविद्यालयात असणाऱ्या ग्रंथालय साधनांचा वापर विद्यार्थी किती करतात, कसा करतात याचा अभ्यास करून तो योग्य त्या प्रमाणात वाढविण्यासाठी, येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी, अभ्यासासाठी हा विषय निवडलेला आहे.

**विषयाची व्याप्ती :**

संशोधनासाठी चंद्रपुर जिल्हयाची निवड केली आहे. कारण यासाठी सर्वच क्षेत्रात विकास करण्यासाठी बराच वाव असून त्यांच्या विकासासाठी मार्ग शोधण्याचे एक काम याद्वारे करता येईल. या जिल्हयातील महाविद्यालयाची ग्रंथालये अभ्यासासाठी घेतली असून स्थापनेपासून ती क्शी विकसीत झाली या दृष्टिकोणातून याचा आढावा घेण्यात येईल.

**विषयाचा व्यावसायिक दृष्टिकोण :**

महाविद्यालयीन ग्रंथालयात अनेक सेवा दिल्या जातात. त्यात प्रामुख्याने देव–घेव, वाचनकक्ष सुविधा, नियतकालिके, संदर्भ सेवा, इंटरनेट सेवा, इत्यादींचा समावेश होतो. या सर्व सेवामंध्ये संदर्भ सेवेला संशोधकाच्या दषृिटने अत्यंत महत्व आहे. ही सेवा निरनिराळया संदर्भ ग्रंथाचे आधारे दिली जाते. यासाठी विविध संदर्भ ग्रंथालयात असणे आवश्यक आहेत. या अभ्यासाद्वारे जिल्हयातील महाविद्यालयात कोणकोणते संदर्भ ग्रंथ उपलब्ध आहेत याचाही गोषवारा याद्वारे मिळणार आहे. या संदर्भ ग्रंथांचा उपयोग त्यांच्या संप्रेषणाची परिणामकारकता यांची सविस्तर माहिती उपलब्ध होऊ शकेल. या अभ्यासाच्या माध्यमातून संदर्भ ग्रंथांची एक संघ तालिकाही देण्यात येईल. ज्याद्वारे कोणते संदर्भ ग्रंथ कोणत्या महाविद्यालयात उपलब्ध आहेत हे चटकन कळेल.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

संशोधनासाठी खालिल उद्दिष्टे निश्चित केलेली आहेत.

1) चंद्रपुर जिल्हयातील उच्च शिक्षण संस्थेतील ग्रंथालयातील साधन सामुग्रीच्या उपलब्धतेचा शोध घेणे.

2) उच्च शिक्षण संस्थेतील ग्रंथालयातील उपलब्ध साधन सामुग्रीचा वापर किती होतो याचा शोध घेणे.

3) उच्च शिक्षण संस्थेतील ग्रंथालयात दिल्या जाणाऱ्या सेवा सुविधांचा दर्जा यांचा शोध घेणे.

4) उच्च शिक्षण संस्थेतील साधन सामुग्रीच्या, उपयुक्ततेच्या कारणांचा शोध घेणे.

5) साधन, सुविधा, सेवा, साहित्य यांचा वापर वाचकांकडून जास्तीत जास्त कसा केला जाईल यासाठी उपाय सुचविणे.

6) उपलब्ध संदर्भ ग्रंथाची संघतालिका तयार करणे.

**गृहितके :**

संशोधनासाठी खालिल गृहितके निश्चित केली आहेत.

1) जिल्हयातील उच्च शिक्षण संस्थेतील ग्रंथालयात पुरेशा प्रमाणात साधनसामुग्री उपलब्ध आहे.

2) सेवा, सुविधांचा दर्जा नॅकच्या दृष्टिकोणातून सामान्य आहे.

3) साधन सामुग्रीच्या उपयोगितेचे प्रमाण अल्प आहे.

4) ई–माध्यमांचा ग्रंथ वाचनावर परिणाम झाला आहे.

**निष्कर्ष व शिफारशी :**

1) ग्रंथालयाची वाढ – तालुकानिहाय महाविद्यालयीन ग्रंथालय

2) ग्रंथालयातील उपलब्ध संसाधने –

1) पायाभुत घटक–इमारत, विभाग, उपकरणे, उपस्कर

2) ग्रंथसंग्रह विकास – ग्रंथसंग्रह

3) आर्थिक संसाधन

4) मानव संसाधन

3) ग्रंथालयातील उपलब्ध आधुनिक माहिती सेवा

4) उपयोजकांचे स्वरूप

5) उपयोजकांच्या गरजा

6) आधुनिक माहिती सेवांची उपयुक्तता

उपरोक्त पैलुचा अभ्यास तथ्य तक्त्यामध्ये विश्लेशीत करून संशोधन प्रकल्पात सादर करण्यात आली त्याबाबतचे निरीक्षण नोंदविण्यात आले असून खालिलप्रमाणे निष्कर्ष काढण्यात आले.

**ग्रंथालयातील उपलब्ध संसाधने :**

**पायाभुत घटक**

1) स्वतःच्या इमारतीत असणारे महाविद्यालय ग्रंथालय सर्वाधिक प्रमाणात आढळून आले.

2) ग्रंथालय विभागातील जास्तीत जास्त प्रमाणात संयुक्त विभागाचा वापर होतो.

3) केवळ एकाच ग्रंथालयात आधुनिक माहिती सेवांसाठी संगणकाचा वापर होतो.

**आधुनिक माहिती सेवाची उपयुक्तता :**

आधुनिक माहिती सेवाची उपयुक्तता दर्शविणारा सर्वाधिक उपयोजीत घटक म्हणजे विद्यार्थी हा असून त्यांनी ग्रंथालयात इंटरनेट या आधुनिक माहिती सेवेची उपयुक्तता ही काळाच्या गरजेनुसार उपयोजकांच्या दृष्टिने अत्यंत उपयुक्त आहे. असे मत व्यक्त केले आहे. त्याचसोबत अध्यापक आणि शिक्षकेत्तर या उपयोजकांनी सुध्दा इंटरनेटला अव्वल दर्जा देऊन प्रत्येक ग्रंथालयात ई–मेल, प्रतिरूपलेखन, ओपॅक, डिजीटायझेशन, ई–बुक, ई–जर्नल, आरएफआयडी, वायफाय, नेटवर्कींग, ऑनलाईन डाटा, सीसी टिव्ही, फ्छथ्स्ठछम्ज षी संपर्क ई–मेल कॅटलॉग, ओसीएलसी, इंटरनेटद्वारे आंतरग्रंथालयातील सेवा, आज्ञावली, इतर सोयी (सुसज्ज इमारत, प्रशिक्षित कर्मचारी, अद्यावत उपकरणे) या सर्वच आधुनिक माहिती सेवा उपयोजकांच्या गरजेनुसार उपयुक्त आहेत असे मत व्यक्त केले आहेत.

**शिफरशी :**

1) ग्रंथालयातील आधुनिक सेवांची उपयुक्तता वाढविण्याच्या दृष्टिने पायाभूत घटकात सुधारणा करणे आवश्यक आहे.

2) ग्रंथालय इमारतीच्या चटई क्षेत्रात वाढ करणे किंवा विस्तार करणे, अद्यावत उपस्कर उपलब्ध करून देणे तसेच संगणक, झेरॉक्स मशीन इ. उपलब्ध करून देणे.

3) ग्रंथालयाच्या ग्रंथसंग्रह विकासात वाढ करणे, संदर्भ ग्रंथात वाढ करणे, नियतकालिके वर्गनिकष्त करणे.

4) ग्रंथालयाला अनुदान पध्दत उपलब्ध करण्याच्या दृष्टिने प्रयत्न करणे व प्रगती वाढविणे.

5) ग्रंथालयात अधिक पदांची भरती करणे, कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे, कर्मचाऱ्यांसाठी सेमीनार, वर्कशॉप सारखे प्रशिक्षण राबविणे.

6) वाचकांना संगणक सेवा उपलब्ध करून देणे, ई–बुक्स, ई–जर्नल उपलब्ध करून देणे.

उपरोक्त बाबींचा भर घालून आधुनिक माहिती सेवांची उपयुक्तता देणे.

यावरून असे निदर्शनास येते की, चंद्रपुर जिल्हयातील महाविद्यालय ग्रंथालयात उपयोजकांना आधुनिक माहिती सेवांची उपयुक्तता अत्यंत महत्वपुर्ण आहे परंतू त्या ग्रंथालयाकडून

पुरविल्या जात नाही. त्यामुळे त्या बदलत्या परिस्थितीत वाचकांच्या हित व विकासासाठी पुरविणे अत्यंत आवश्यक आहे. त्याकरिता ग्रंथालय, महाविद्यालय, व्यवस्थापन व शासन यांनी युध्दपातळीवर प्रयत्न करणे गरजेचे आहे.

**संदर्भ :**

जैन, देशपांडे, डाखोळे आणि खेडकर, 2001, सुलभ ग्रंथालयशास्त्र, नागपूर, विश्वप्रकाशन.

तपस्वी, मु.पु. 1995, ग्रंथालयात संगणकाचा उपयोग, नाशिक, य.च.मु.वि. प्रकाशन.

नातू, श्री. रा., 1995, 'माहिती सेवा आणि संघटना', नाशिक, य.च.मु.वि. प्रकाशन.

फडके, द.ना., 2007, 'ग्रंथालयाचे आधुनिकीकरण आणि संगणकीकरण', पुणे, युनिव्हर्सल प्रकाशन.

बोधनकर आणि अलोणी, 1999, 'सामाजिक, संशोधन पध्दती', नागपूर, साईनाथ प्रकाशन.

त्रिपाठी, लाल, आणि कुमार, 2001, 'ग्रंथालय एवं सुचना विज्ञान', न्यु दिल्ली, एस.एस. प्रकाशन.

अधिकारी, एम.एम., 2006, 'संदर्भसेवा आणि नितीतत्वे यातील सर्व विविध रूपे असलेला संदर्भ ग्रंथपाल' माहिती ग्रंथालय आणि समाजाचे भारतीय नियतकालिक, खंड 19, क्र. 3–4, पृ. 145–149

कोर, ए., 2007, 'पंजाब आणि चंदिगड येथील विद्यापीठ ग्रंथालयातील माहिती सेवा आणि उत्पादनाचे विपणन (मार्केटींग)', आयस्लिक बुलेटीन, खंड 52, क्र. 2, प्र. 83–98.

खोडे, एस. आणि खोडे, ए., 2003, 'वाचकाचे समाधान आणि ग्रंथालय सेवा', माहिती ग्रंथालय आणि समाजाचे भारतीय नियतकालिक, खंड 16, क्र. 1–2, पृ. 49–52